

# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी मुंबई शहर जिल्हा

## जाहीर आवाहन

## सन 2018-19 या वित्तीय वर्षात जमिनीचा कर व थकीत कर शासन निर्णयानुसार शासन खाती जमा करणेत यावा

मुंबई शहर जिल्ह्यातील जमीनींच्या कर दात्यांना याव्दारे कळविणेत येते कि,जमीनींचा कर व थकीत कर शासन नियमानुसार वेळेत शासन खाती जमा करणेकरिता शासनाने ऑनलाईन सेवा उपलब्ध करून दिलेली आहे. https://gras.mahakosh.gov.in या संकेतस्थळावर भरणे हि आपली स्वत:ची जबाबदारी आहे. आपण मुंबई शहरातील सुजाण नागरीक म्हणुन आपली जबाबदारी पार पाडावी व वेळेत जमीनींचा कर शासन खाती जमा करुन व्याजाच्या आकारणीपासुन दुर रहावे.

1) शासनाने भाडेपट्याने दिलेल्या जमीनींचे कर नियमीत शासनखाती जमा करणारे करदाते.
2) शासनाने बीबीआर येथील भाडेपट्याने दिलेल्या जमीनींचे करदाते.
3) शासनाने भाडेपट्याने दिलेल्या जमीनींच्या वापरात व सदनिकेच्या वापरात वेळोवेळी बदल केले असल्यास अशा करदात्यांनी कार्यालयाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.
4) शासनाने भाडेपट्याने दिलेल्या जमीनींचे हस्तातंरण / पुनर्विकास/वापरात बदल/वाणिज्यक बदल करणारे करदाते.
5) शासनाने भाडेपट्याने दिलेल्या जमीनींचा कर व बीबीआर मधील भाडेपट्याने दिलेल्या जमीनींचा कर सुधारीत शासन निर्णयानुसार शासनखाती जमा करणे करदाते यांना बंधणकारक आहे.
6) शासनाने भाडेपट्याने दिलेल्या जमिनी व खाजगी जमीनींच्या कराची रक्कम शासनखाती जमा करणारी बृहन्मुंबई महानगरपालिका.
7) शासनाने भाडेपट्याने दिलेल्या जमीनी व खाजगी जमीनींच्या कराची रक्कम शासनखाती जमा करणारी महानगर टेलीफोन निगम लि.मुंबई.
8) शासनाने भाडेपट्याने दिलेल्या जमीनी व खाजगी जमीनींच्या कराची रक्कम शासनखाती जमा करणारी म्हाडा मुंबई.
9) शासनाने भाडेपट्याने दिलेल्या जमीनी व खाजगी जमीनींच्या कराची रक्कम शासनखाती जमा करणारी बेस्ट मुंबई.
10) खाजगी जमीनींचा कर ( इनामी व विशेष अवधी निर्मुलन शाखा ) करनिर्धारणा केलेले करदाते.
11) खाजगी जमीनींचा कर निर्धारीत करुन घेतलेला नाही अशा कर दात्यांनी तहसिलदार,ईनामी व विशेष अवधी निर्मुलन शाखा,तळमजला यांचेशी संपर्क साधुन करनिर्धारणा करुन घ्यावी व करदात्यांनी जमीनींचा कर शासनखाती जमा करुन आपली जबाबदारी पार पाडावी मिळकतीची करनिर्धारणा करणे ही कायद्यानुसार आवश्यक बाब आहे.
12) शासकीय भाडेपट्याने दिलेल्या जमिनींचे करदाते व खाजगी जमिनींचे करदाते यांनी https://gras.mahakosh.gov.in या संकेतस्थळावर जमिनींचा कर भरणेस व जमीनींच्या कराबाबत काही अडचणी आल्यास मिळकतदारांनी संबधीत कार्यालयाशी संपर्क साधावा. संपर्क क्रमांक – 022 22660235.
13) भाडेपट्याची मुदत संपलेल्या जमिनीचा कर कार्यालयाची परवानगी घेवूनच भरणे आवश्यक आहे.

सही/-
( शिवाजी जोंधळे)
जिल्हाधिकारी मुंबई शहर